MHKO100000542008

**नियमीत दिवाणी दावा क्र. ११/२००८**

भैरु कांबळे-म.वा.- वगैरे.
विरुध्द
सखाराम कांबळे-म.वा.- वगैरे.

**निशाणी क्र. १०८ व ११३ वर आदेश**

वादीच्या वारसांनी प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादी क्र.१(अ) सुमित्रा भैरु कांबळे यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होणेसाठी व दावा अवसानाचा (अबेटमेंट) आदेश रद्द होऊन मिळणेसाठी विनंती केलेली आहे. प्रतिवादींतर्फे अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शणास येत आहे की, वादी क्र.१(अ) सुमित्रा भैरु कांबळे हया दिनांक २५/०३/२०२५ रोजी मयत झालेले आहेत व प्रस्तुतचे अर्ज हे दिनांक १९/०७/२०२५ व १२/०९/२०२५ रोजी दाखल केलेले आहेत. मुदतीचे अधिनियम १९६३ चे आर्टीकल १२० प्रमाणे वादीच्या वारसांनी स्वतःला वादीच्या मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांमध्ये अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. तसेच, मुदतीत वारस अभिलेखावर न घेतल्यास आदेश २२, नियम ४ प्रमाणे तो दावा मयत वादीविरुध्द दावा अवसान (Abate) होतो. आदेश २२, नियम ४ (५) (ब) प्रमाणे वादी उशिराबाबत संयुक्त कारण दाखवत असेल तर न्यायालयाला विलंब माफ करुन वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देता येईल.

०३. त्याप्रमाणे, प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता, वादीच्या वारसांना यांना बराच विलंब झालेला आहे. त्याबाबत वादी यांनी मुदतीचे अधिनियम १९६३ चे कलम ५ प्रमाणे संयुक्त कारण दिलेले आहे का हे पाहणे गरजेचे आहे. वादीच्या वारसांचे असे कथन आहे की, ते कामानिमीत्त परगावी असलेने व मयत वादी क्र.१अ हिचा मृत्यू दाखला संबंधीत कार्यालयाकडून मुदतीत उपलब्ध न झालेने त्यांना आपल्या वकीलांना भेटून वादी क्र.१अ चे वारसांची माहिती देता आली नाही. त्यामुळे, त्यांना वारस अभिलेखावर आणणेसाठी विलंब झालेला आहे असे कारण नमुद केलेले आहे. सदर

कारण व विलंबाचा काळ पाहता वादीच्या वारसांनी अर्जात नमुद केलेले कारण हे संयुक्तीक होत नाही. परंतु, दाव्याचे स्वरुप पाहता प्रकरणाची गुणदोषावर निर्गती करण्याकरीता वादी क्र.१(अ) यांचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. त्यामुळे, त्यांना अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करणे व अबेटमेंटचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत वादीचे वारसांवर अर्जाचा खर्च ठेवून त्याची भरपाई प्रतिवादी यांना देणे योग्य होईल. सबब, मी पुढील आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

०१. अर्ज रक्कम रु.३००/- (रुपये तीनशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहेत.

०२. वादी क्र.१(अ) सुमित्रा भैरु कांबळे यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करुन दावा अवसानचा (अबेटमेंट) आदेश रद्द करण्यात येत आहे.

( खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला )

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SACHIN DURGASHANKAR MEHTA
Date: 2026.01.20 18:09:42 +0530

**( एस. डी. मेहता )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः २०/०१/२०२६.